**<u>रे.दि.मु. क्रमांक १४०/२०१४ मधील निशाणी क्रमांक ५ वरील आदेश</u>**

०१. वादीने सदरचा अर्ज हा प्रतिवादींनी दावा मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस स्वत: अगर इतरांमार्फत हरकत अडथळा करू नये म्हणुन तुर्तातुर्त मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादींनी कथन केले आहे की, दावा मिळकती या त्याचा पुर्व हक्कदार रघुनाथ दत्तात्रय खांडके यांच्या मालकी हक्काच्या व वाटुन आलेल्या मिळकती होत्या. त्यांच्या मृत्युनंतर दावा मिळकती वादीला वारसाहक्काने प्राप्त झाल्या आहेत. वादीच्या वडीलांनी दावा मिळकती प्रतिवादींचे पुर्व हक्कदार सिताराम दाजी महार व पांडुरंग दाजी महार यांना कुळ हक्काने दिल्या होत्या व त्याप्रमाणे ते वहिवाट करीत होते. त्यानंतर, रघुनाथ खांडके यांनी मुंबई कुळ कायदा व शेत जमिन नियम १९४८ चे कलम ३३ ब प्रमाणे सिताराम दाजी महार वगैरे यांचा कुळ हक्क संपुष्टात आणुन कब्जा जमिन मालकास देण्याचा आदेश झाला. त्याप्रमाणे, तहसिलदार पाटण यांनी कुळांना नोटीस काढुन म्हणणे घेवुन दिनांक १३/१०/१९८० रोजी रघुनाथ खांडके यांना वाद मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा दिला. त्यानुसार, रघुनाथ खांडके हे वहिवाट करून उत्पन्न घेवु लागले व तसा फेरफार क्रमांक २५२८ ने नोंद केली आहे. रघुनाथ खांडके नंतर वादी हे वहिवाट करून उत्पन्न घेत आहेत.

०३. प्रतिवादींचा दावा मिळकतीशी कसलाही संबंध नसताना त्यांनी तहसिलदार पाटण यांच्याकडे मुंबई कुळ कायदा कलम ७०/ब नुसार अर्ज दाखल करून कुळ असल्याचा चुकीचा निर्णय मिळवला होता. परंतु, वादीतर्फे उपविभागीय अधिकारी, कराड यांच्याकडे टेनन्सी/अपील क्रमांक ०६/०६ चे अपील दाखल केले असता, त्याचा निर्णय दिनांक ३१/०५/२००७ रोजी होवुन तहसिलदार यांचा निर्णय रदद् केला. सदर निर्णयाविरूध्द कोणत्याही वरिष्ठ न्यायालयात अपील केलेले नाही. उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक १३/१०/१९८० रोजी वादीचे पुर्व हक्कदार यांना दिलेला कब्जा व त्या पासुन वादीची वहिवाट ग्राहय धरली आहे. प्रतिवादी हे मागासवर्गीय समाजातील असल्याचा गैरफायदा घेवुन वादीच्या दावा मिळकतीतील वहिवाटीस हरकत अडथळा करू लागले. त्यामुळे, वादींनी तहसिलदार यांच्याकडे ताकीद मागण्यासाठी प्रकरण दाखल केले. त्यामध्ये अंतिम निर्णयासाठी ६ महिन्यापेक्षा जास्त वेळ प्रकरण ठेवले आहे. परंतु तहसिलदार निर्णय देत नाहीत. दिनांक ०८/०६/२०१४ रोजी वादी हे दावा मिळकतीत

भात पेरण्यासाठी गेले होते. त्यांनी भाताची पेरणी केली. वादी हे परत येण्याच्या तयारीत असताना प्रतिवादींनी दावा मिळकतीत पाय टाकला तर तुमच्या घरातील सर्वांना अक्ट्रॉसिटीमध्ये अडकवणार आहे अशी भिती घातलेने वादींना मशागत करण्यास दावा मिळकतीत जाता येत नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती वादींनी केली आहे.

०४. प्रतिवादींनी निशाणी १७ वर म्हणणे दाखल करून दावा मिळकतीचे क्षेत्र, आकारणी व हिस्सा कबुल केले आहे. त्यांनी इतर सर्व कथनांचा इन्कार केला आहे. प्रतिवादींनी कथन केले आहे की, दाव्यातील वंशावळ चुकीची आहे. वादींचे पुर्व हक्कदार रघुनाथ खांडके व त्यांचे मयत बंधु वसंत व बाळकृष्ण यांच्यामध्ये वाटप झालेले नाही. वसंत दत्तात्रय खांडके व बाळकृष्ण खांडके यांचे १/३ हिश्यास ३२ ग होवुन प्रतिवादी कमांक १ चे मयत वडील सिताराम दाजी महार (देवकांत) यांच्या नांवे दिनांक ११/०३/१९८३ रोजी ३२ एम. चा दाखला देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, मयत शंकर पांडु महार यांच्या नांवे दिनांक २९/११/१९८४ रोजी ३२ एम. चा दाखला देण्यात आला. त्यामुळे, वादींचे पुर्व हक्कदार मयत रघुनाथ खांडके, वसंत खांडके व बाळकृष्ण गोविंद खांडके यांच्या दरम्यान वाटप होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. वादींचे वडील रघुनाथ दत्तात्रय खांडके यांनी प्रतिवादींचा कुळ हक्क संपुष्टात आणलेला नाही. प्रतिवांदीचे पुर्व हक्कदारांना त्याकामी नोटीस मिळालेली नाही. दावा मिळकत ही प्रतिवादींची कुळ हक्काची मिळकत असुन त्यामध्ये प्रतिवादींचे सामाईकामध्ये ५ आणे ४ पै. चा हिस्सा आहे. प्रतिवादी हे दावा मिळकत पुर्व हक्कदारांपासुन कब्जात ठेवुन उत्पन्न घेत आलेले आहेत.

०५. दावा मिळकतीमध्ये मुळ मालक रघुनाथ खांडके, वसंत दत्तात्रय खांडके व बाळकृष्ण गोविंद खांडके हे प्रत्येकी ५ आणे ४ पै. हिश्याने मुळ मालक होते. ते व्यापार करणारे लोक असल्याने व त्यांना शेती करण्याचे कोणतेही ज्ञान नसल्याने मिळकती कुळ हक्काने प्रतिवादींचे पुर्व हक्कदार मयत पांडु दाजी महार व सिताराम दाजी महार यांना दिल्या होत्या व त्या बदल्यात खंड रूपाने दरसाल धान्य देत होते. शंकर पांडुरंग महार व सिताराम दाजी महार यांनी बाळकृष्ण गोविंद खांडके व वसंत रामचंद्र खांडके यांच्या विरूध्द मिळकती मधील १/३ हिश्याचे ३२ ग करून मागण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्याची चौकशी होवुन दिनांक २९/११/१९८४ व १८/०३/१९८३ रोजी ३२ एम. चा दाखला प्रतिवादीचे पुर्व हक्कदारांना देण्यात आला. त्यानुसार, मयत सिताराम दाजी व शंकर पांडु महार हे दाव्यामधील १/३ हिश्याचे मालक झालेले आहेत. प्रतिवादींचे पुर्व

हक्कदार हे वृध्दापकाळाने व आजारीपणाने वादीचे वडील रघुनाथ दत्तात्रय खांडके यांच्या विरूध्द अर्ज दाखल करू शकले नाहीत.

०६. प्रतिवादी क्रमांक १ यांनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी हे कुळ आहेत असे ठरवुन मागण्यास तहसिलदार पाटण यांच्याकडे टेनन्सी केस क्रमांक ७० ब ७/२००२ चा अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये, मुळ मालक यमुनाबाई रघुनाथ खांडके यांना नोटीस काढुन व चौकशी करून प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांनी दावा मिळकतीमध्ये दिनांक ३०/०६/२००६ रोजी कुळ ठरविण्यात आलेले आहे. सदर निर्णयाच्या विरूध्द वादीचे पुर्व हक्कदार यमुनाबाई रघुनाथ खांडके यांच्या विरूध्द उपविभागीय अधिकारी कराड यांच्याकडे टेनन्सी अपील क्रमांक ६/६ दाखल केले होते. सदर अपील मंजुर झाले होते. त्याच्याविरूध्द, प्रतिवादींनी पुणे येथे विभागीय आयुक्त यांच्या न्यायालयात फेर तपासणीचा अर्ज क्रमांक १२५/२००७ दाखल केला आहे व त्याचे कामकाज प्रलंबित आहे. वादींनी दावा मिळकतीचे चतु:सिमापुर्वक वर्णन दिलेले नाही कारण दावा मिळकती त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात नाहीत. त्यामुळे, दावा मिळकतीची ओळख होत नाही.

०७. वादींनी वंशावळीमध्ये त्याचे मयत भाऊ प्रभाकर, सुभाष व भास्कर यांचे कायदेशीर वारस सामील केलेले नाहीत. वादींचे बंधु दिलीप रघुनाथ खांडके यांना पक्षकार म्हणुन सामील केलेले नाही. वादी व त्यांचे बंधुचे कुटुंबीय वेगवेगळे राहत असुन ते विभक्त आहेत. वादीस त्याच्या भावामार्फत दावा दाखल करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. दिनांक १२/१०/१९८० रोजीची कब्जेपटट्ी चुकीची आहे. त्यामध्ये वादीच्या पुर्व हक्कदारांना कोणत्या बाजुचे क्षेत्र चतु:सिमापुर्वक दिले याचा उल्लेख दिसुन येत नाही. वादींनी बनावट कागदपत्रांच्या आधारे दावा दाखल केला आहे. त्यामुळे, तो नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

०८. वरील सर्व बाबी वरून सदर अर्ज निकाली काढण्यासाठी खालील मुददे निघत असुन त्यावरील निष्कर्ष सकारण पुढीलप्रमाणे :—

| **अ.क.** | **मुदद्े** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने त्याच्या हक्कात प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे शाबित केले आहे का ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | वादीने त्याच्या हक्कात सोईचा समतोल असल्याचे शाबित केले आहे का ? | होकारार्थी |
| ३. | सदर अर्ज नामंजुर झाल्यास अपरिमित नुकसान होईल असे वादीने शाबित केले आहे का ? | होकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## —: <u>कारणमिमांसा</u> :—

०९. वादीने सदर अर्जाच्या पृष्टयर्थ निशाणी ७ व ८ वर गट क्रमांक ६६/१ व ६६/२ चे सातबारा उतारे, निशाणी ३/३ वर टेनन्सी केस क्रमांक ४५१, ४५२/६२ च्या नक्कला, निशाणी ३/४ वर उपविभागीय अधिकारी कराड यांचे टेनन्सी/ अपील क्रमांक ६/६ मधील हुकुम, निशाणी ३/५ वर फेरफार क्रमांक २५२८ चा उतारा, निशाणी ३/६ वर कब्जा नोटीसची स्थळप्रत व निशाणी ३/७ वर कब्जेपटट्ीची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. याउलट, प्रतिवादींनी निशाणी २५/१ वर टेनन्सी/ केस क्रमांक ७०ब/७/२ मधील निर्णयाची समज, निशाणी २५/२ वर तहसिलदार पाटण यांच्या नक्कला, निशाणी २५/३ वर प्रतिवादींनी विभागीय आयुक्त पुणे यांच्या न्यायालयात दाखल केलेले अर्जाची प्रत, निशाणी २५/४ व ५ वर फेरफार क्रमांक ६६९३ व ४९४१ चे उतारे व निशाणी २५/६ व ७ वर कलम ३२ एम चे दाखले दाखल केले आहेत.

१०. वादी तर्फे विधीज्ञ श्री. ए.आर. जानुगडे यांचा तर प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. आर.के.भिसे यांचा युक्तीवाद ऐकला.

११. **<u>मुददा क्रमांक १ ते ३ बाबत</u>** :—

वादीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादीचे पुर्व हक्कदार हे दावा मिळकतीमध्ये कुळ होते. परंतु, वादीच्या पुर्व हक्कदारांनी सक्षम न्यायालयात प्रकरण दाखल करून प्रतिवादींचे पुर्व हक्कदारांचे कुळ हक्क संपुष्टात आणले आहेत व तहसिलदार पाटण यांचे आदेशाने वादीस कब्जा मिळाला आहे. सध्या प्रतिवादी हे वादींना धमकी देवुन दावा मिळकतीत वहिवाट करू देत नाहीत. याउलट, प्रतिवादीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की,

वादी हे आजही कुळ नात्याने दावा मिळकतीच्या वहिवाटीमध्ये आहेत. प्रतिवादी हे दावा मिळकतीत वहिवाट करीत असुन त्या विषयीचा वाद सुध्दा मा. विभागीय आयुक्त पुणे यांच्या समोर प्रलंबित आहे.

१२. वादी व प्रतिवादीमधील वाद पाहता, प्रतिवादींचे पुर्व हक्कदार हे दावा मिळकतीमध्ये पुर्व कुळ होते ही बाब उभयंतांना कबुल असल्याचे दिसुन येते. वादी व प्रतिवादींच्या कथनानुसार त्यांच्यामध्ये विविध प्रकरणे महसुल न्यायालयात झालेली दिसुन येतात. प्रतिवादींच्या पुर्व हक्कदारांच्या हक्कात गट क्रमांक ६६/१ व ६६/२ मधील वसंत खांडके व बाळकृष्ण खांडके यांच्या मालकीच्या मिळकतीबाबत कलम ३२ एम. चा दाखला मिळाल्याचे निशाणी २५/६ व ७ वरून शाबित होते. याविषयी वादीने कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. वादी व प्रतिवादी मधील वाद हा उर्वरीत रघुनाथ खांडके यांच्या हिश्याबाबतचा आहे. वादीचे कथनानुसार त्याचे पुर्व हक्कदारांनी कुळ हक्क संपुष्टात आणुन कब्जा मिळवलेला आहे. निशाणी ३/३ चे अवलोकन करता, टेनन्सी केस क्रमांक ४५१, ४५२/६२ या मधील निर्णयानुसार दावा मिळकती मधील रघुनाथ खांडके यांचा हिस्सा पांडु दाजी देवकांत तर्फे शंकर पांडु महार व सिताराम दाजी देवकांत या कुळाकडुन वादीचे पुर्व हक्कदारांना देण्याचा आदेश झालेला आहे. सदर आदेशामध्ये वादीचे पुर्व हक्कदारांना कलम ८८ क प्रमाणे माफीचा दाखला मिळाल्याचा उल्लेख केलेला आहे. निशाणी २५/१ व २ चे अवलोकन करता, तहसिलदार पाटण यांनी प्रतिवादी हे दावा मिळकतीबाबत कुळ असल्याचे निर्णयात नमुद केले आहे. परंतु, सदर निर्णय हा उपविभागीय अधिकारी कराड यांनी रदद् केल्याचे निशाणी ३/४ वरील निकाल पत्रावरून दिसुन येते. सदर उपविभागीय अधिकारी यांच्या निर्णयाविरूध्द प्रतिवादींनी विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे अर्ज क्रमांक १२५/७ दाखल केल्याचे निशाणी २५/३ वरून दिसुन येते. विभागीय आयुक्त, पुणे यांनी उपविभागीय अधिकारी कराड यांचा निर्णय स्थगित किंवा रदद् केलेला नाही. सद्य परिस्थितीमध्ये तहसिलदार पाटण यांचा निर्णय रदद्बातल आहे हे स्पष्ट होते.

१३. निशाणी ८ व ९ चे अवलोकन करता, वादीच्या कुटुंबाच्या दावा मिळकतीस नोंद असल्याचे दिसुन येते. निशाणी ३/५ वरील फेरफार क्रमांक २५२८ चे अवलोकन करता, दावा मिळकतीचा कब्जा कुळ कायदा अव्वल कारकुन पाटण यांच्या आदेशानुसार कब्जेपटट्ीने दिनांक १३/१०/१९८० रोजी दिला असल्याचे दिसुन येते. निशाणी ३/६ वरून कब्जा देणेबाबत वादींच्या पुर्व हक्कदारांनी नोटीस दिल्याचे दिसुन येते. निशाणी

३/७ वरील कब्जेपटट्रीवरून दावा मिळकतीमधील म्हणजेच सर्व्हे क्रमांक ६६/१ मधील पश्चिम बाजुने १८ गुंठे क्षेत्र कुळांच्या ताब्यातुन काढुन घेवुन रघुनाथ खांडके यांना दिल्याचे दिसुन येते. अभिलेखावरील सर्व कागदपत्रे पाहता, प्रतिवादी व त्यांचे पुर्व हक्कदारांकडुन कब्जेपटटी, वादीच्या पुर्व हक्कदारांना कब्जा देण्याचा झालेला आदेश व माफीचा दाखला देण्याचा आदेश रदद् करण्याबाबत कोणतीही कारवाई केली नसल्याचे दिसुन येते. कब्जेपटट्री व निशाणी २५/६ व ७ वरील दाखला पाहता, प्रतिवादींची कुळ वहिवाट व वादीचे पुर्व हक्कदार यांची मालकी वहिवाट वेगवेगळी असल्याचे दिसुन येते.

१४. उपलब्ध पुराव्यावरून सद्य परिस्थितीमध्ये वादीचे कुटुंब हे दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीमध्ये असल्याचे दिसुन येते. प्रतिवादींनी त्यांची वादीचे पुर्वहक्कदारांना कब्जेपटटीने दिलेल्या मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रतिवादींची कथने पाहता, ते वादींच्या कुटुंबाची संपुर्ण मालकी व वहिवाट नाकारत असल्याचे दिसुन येते. यावरून प्रतिवादी हे वादींच्या वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत ही बाब स्पष्ट होते. त्यामुळे, प्रथमदर्शनी प्रकरण व सोयीचा समतोल वादींच्या हक्कात आहे. तसेच, सदर अर्ज नामंजुर केलेस व प्रतिवादींचा हरकत अडथळा तसाच सुरू राहिलेस वादींच्या मालकी व कब्जाच्या हक्कावर गदा येणार आहे.

१५. प्रतिवादींनी सदर दाव्यात वादींच्या भावाला व त्यांच्या वारसांना पक्षकार केलेले नसल्याबाबतचा मुदद्ा उपस्थित केला. परंतु, दाव्यातील कथने पाहता, सदरचा दावा हा वादीने त्याच्या सर्व कुटुंबीयांमार्फत म्हणजेच रघुनाथ खांडके यांच्या सर्व वारसांमार्फत दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी रघुनाथ खांडके याचे सर्व वारस विभक्त राहतात असे कथन केले आहे. परंतु, त्याविषयी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे, सदरचा दावा हा आवश्यक पक्षकार अभावी बाधीत आहे असे सध्या तरी म्हणता येणार नाही. प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या चतु:सिमा दिल्या नसल्याचे कथन केले आहे. परंतु, कब्जेपटट्री व प्रतिवादींचे पुर्व हक्कदारांच्या हक्कातील ३२ एम. चा दाखला पाहता, वादी व प्रतिवादींची वहिवाट वेगवेगळी असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, चतु:सिमेबाबत वाद उपस्थित करता येणार नाहीत.

१६. सबब, मुदद्ा क्रमांक १ ते ३ यांचा निष्कर्ष होकारार्थी नोंदवुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :—

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी स्वतः अगर इतरांमार्फत वादींच्या कुटुंबीयांच्या दावा मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत अगर इतर आदेश पारीत करेपर्यंत हरकत अडथळा करू नये अशी ताकीद देण्यात येते.

पाटण
दिनांक — ०३/०९/२०१४

(शशिकांत रा. मोकाशी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर पाटण.